# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## जाहिर प्रकटन

या प्रकटनाद्वारे सर्व संबधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(च)(छ)(ज)(झ)[30(4)(f)(g)(h)(i)] अन्वये अधिसभेचे सदस्य असतील अशा, प्राचार्य, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी आणि नोंदणीकृत पदवीधर सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेने निवडून द्यावयाचे प्रत्येकी दोन सदस्यांपैकी एक अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग या प्रवर्गातून निवडून आलेले आहेत अशा, सदस्यांमधून आळीपाळीने निवडण्यात येईल, अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अंमलात आल्यानंतर सन २०१७ साली विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या निवडणुका प्रथमच घेण्यात आल्या होत्या. त्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(च)(छ)(ज)(झ)[30(4)(f)(g)(h)(i)] अन्वये अधिसभेचे सदस्य असतील अशा, प्राचार्य, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी आणि नोंदणीकृत पदवीधर सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेने निवडून द्यावयाच्या प्रत्येकी दोन सदस्यांपैकी राखीव प्रवर्गातील एका सदस्यांचे प्रारंभिक आरक्षण हे मा. कुलगुरु यांनी चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात आले होते. त्याबाबतचे जाहिर प्रकटन क्र. साफुपुविनि/५८९ दि. ८.२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते. त्यामुळे यावेळेस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(च)(छ)(ज)(झ)[30(4)(f)(g)(h)(i)] अन्वये अधिसभेचे सदस्य असतील अशा, प्राचार्य, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी आणि नोंदणीकृत पदवीधर सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेने निवडून द्यावयाच्या प्रत्येकी दोन सदस्यांपैकी राखीव प्रवर्गातील एका सदस्यांचे आळीपाळीने येणारे आरक्षण हे खालीलप्रमाणे आहे, याची सर्व संबंधितांनी नोद घ्यावी.

| अ.क्र. | म.सा.वि.अ., २०१६ मधील कलम | मतदार संघ | सन २०१७ साठी चिठ्ठीद्वारे सोडत काढून ठरविण्यात आलेले प्रारंभिक आरक्षण बिंदू | सन २०२२ साठी आळीपाळीने आलेला आरक्षण बिंदू |
|---|---|---|---|---|
| १. | ३०(४)(च)/30(4)(f) | प्राचार्य | इतर मागासवर्ग (OBC) | अनुसूचित जाती (SC) |
| २. | ३०(४)(छ)/30(4)(g) | अध्यापक व विद्यापीठ अध्यापक | अनुसूचित जमाती (ST) | निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती (DT(VJ)/NT) |
| ३. | ३०(४)(ज)/30(4)(h) | व्यवस्थापन प्रतिनिधी | अनुसूचित जाती (SC) | अनुसूचित जमाती (ST) |
| ४. | ३०(४)(झ)/30(4)(i) | नोंदणीकृत पदवीधर | निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती (DT(VJ)/NT) | इतर मागासवर्ग (OBC) |

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/८९
दिनांक : २८/०१/२०२३

E:\Election_2022_Pravin\Principals, Teachers and HOD\Prakatan.docx